Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ३] गुरुवार ते बुधवार, जानेवारी २१-२७, २०२१/माघ १-७, शके १९४२ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

	पृष्ठे
भाग एक-शासकीय अधिसूचना : नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार-अ, चार-ब व चार-क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	नाही.
संकीर्ण अधिसूचना : नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश.	१-४
भाग एक-अ.—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.	१ - ११४

शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ११.

जिल्हाधिकारी, यांजकडून

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३

क्रमांक विभुअ-बें.प्र.-कावि-४७५-२०२०.—

ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (ई) च्या पत्रकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र. ७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक

प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्यात जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा करण्यात आलेला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर्हू प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत. (विस्थापित होत असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत.);

आणि ज्याअर्थी, सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्त करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.) ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल, त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे ;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), बेंबळा प्रकल्प, यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०२-४७-२०२०-२१,
गाव खैरगांव, तालुका मारेगांव, जिल्हा यवतमाळ.

अनुक्रमांक	भूमापन क्रमांक किंवा गट क्रमांक	अंदाजित क्षेत्र
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	६२/१	० २१
२	६२/२	० ५६
३	६२/३	० १२
४	४६/३	० १४
५	५८	० ४३
६	५९/१	० ०४
७	५९/१/१	० १९
८	६४/१/४	० ५२
९	६४/१/६	० ०८
१०	८/१	० ०९
११	८/१/२	० १२
	एकूण . .	२ ५०

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	: —	बेंबळा प्रकल्प, ता. बाभुळगांव, जि. यवतमाळ.
प्रकल्प कार्याचे वर्णन	: —	का.अ., बेंबळा पाटबंधारे विभाग, यवतमाळ.
समाजाला मिळणारे लाभ	: —	या प्रकल्पाद्वारे सिंचनाचा फायदा होणार असून लाभक्षेत्रातील संबंधित शेतक-यांना सिंचनासाठी फायदा करून घेता येईल व त्यामुळे त्यांचे कृषी उत्पन्नात भर पडून जीवनमान उंचावणार आहे. तसेच भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल.

अनुसूची-तीन

बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

कुणीही व्यक्ती किंवा कुटुंब विस्थापित होत नाही.

अनुसूची-चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश	: —	नवीन भूसंपादन कायदा, २०१३ कलम ६ अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट आहे.

अनुसूची-पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम	:–	निरंक.
(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता	:–	निरंक.
(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील	:–	निरंक.

विशेष नोंद :- उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), बेंबळा प्रकल्प, यवतमाळ यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

दिनांक ६ नोव्हेंबर २०२०.

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२.

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक उपजी-भूसं-र.प्र.-कली-कावि-०२२-२०२१.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना, क्रमांक प्र.अ.-भूसं-र.प्र.-कली-कावि-४१-२०२०, दिनांक २०-०१-२०२० अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची गरज भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयाने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्याचे, विचारात घेतल्यानंतर " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींन्वये " उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी " उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनूसची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केल्या जात असून पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्याकरीता उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रस्ते प्रकल्प, यवतमाळ जि. यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची-एक

जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक १३-४७-२०१८-१९,
गाव वडगाव रोड, तालुका यवतमाळ, जिल्हा यवतमाळ.

अ. क्र.	भूमापन किंवा गट क्रमांक	संपादित अंदाजित क्षेत्र	
(१)	(२)	(३)	
		कृषक	अकृषक
		हे. आर	चौ. मि.
१	४६/२ ब	० २२	०
२	४६/१ ब	०	१८००.००
३	४६/३ ब	० ४३	०
४	६८/१ अ	०	१३९.०५
५	५१/३	० ३४	०
	एकूण क्षेत्र . .	० ९९	१९३९.०५

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :– वर्धा-नांदेड मार्गे यवतमाळ-पुसद नवीन रेल्वे लाईनकरीता.

प्रकल्प कार्याचे वर्णन :– वर्धा-नांदेड मार्गे यवतमाळ-पुसद नवीन रेल्वे लाईनचे सार्वजनिक कामाचे प्रयोजनार्थ.

समाजाला मिळणारे लाभ :– सार्वजनिक हितार्थ.

अनुसूची-तीन

बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक

अनुसूची-चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

– निरंक –

टीप :- उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रस्ते प्रकल्प, यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

एम. देवेंदर सिंह,
जिल्हाधिकारी,
यवतमाळ.

यवतमाळ :
दिनांक १४ जानेवारी २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.